राज्यात “इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय” स्थापन करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: आयुका-२०२६/प्र.क्र.०१ /प्रशा-१**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २४ एप्रिल, २०२६.

संदर्भ- १. शासन निर्णय सा.प्र.वि. क्र. आस्थापना-१२९८/प्र.क्र. २६/९८/१९, दि. ७ मार्च, १९९८.
२. शासन अधिसूचना शाकानि-२०२६/प्र.क्र.२०/र.व.का.-१, दि. २१ एप्रिल, २०२६.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यात डिजिटल अर्थव्यवस्था, ई-प्रशासन, इलेक्ट्रॉनिक्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या क्षेत्रांचा वेगाने विकास होत आहे. या पार्श्वभूमीवर राज्यातील धोरणांची प्रभावी अंमलबजावणी, समन्वय व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संदर्भ क्र. २ येथील अधिसूचनेव्दारे राज्यात स्वतंत्र इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाची स्थापना करण्यात आलेली आहे. सदर विभागाला पाठबळ देण्यासाठी व क्षेत्रीय कार्यालयावर प्रभावी देखरेख व मार्गदर्शन करण्यासाठी वरील संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयाव्दारे निर्माण केलेल्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर करून नवीन **“इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय”** स्थापन करायला दि. ०७/०४/२०२६ रोजी मा. मंत्रीमंडळाची मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार **“इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय”** स्थापन करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

**१. आयुक्तालयाची स्थापना:**

वरील संदर्भीय क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभागाच्या अधिपत्याखाली स्थापन करण्यात आलेल्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाचे रूपांतर करून इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागांतर्गत “इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय” स्थापन करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**२. मुख्यालय:**

आयुक्तालयाचे मुख्यालय मुंबई येथे राहील.

**३. उद्दिष्टे:**

आयुक्तालयाची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे असतील:

- राज्यात इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व **उदयोन्मुख तंत्रज्ञान** क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यास मदत करणे.
- कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा शासकीय व औद्योगिक वापर वाढविणे,

- राज्यात डिजिटल गव्हर्नन्सला गतीमानता प्रदान करणे.
- नवउद्योजकता (Start-ups) व नवोन्मेष (Innovation) यांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाच्या धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे.

**४. कर्तव्ये व जबाबदाऱ्या:**

**४.१ धोरण आखणी व अंमलबजावणी:**

- इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता व **उदयोन्मुख तंत्रज्ञान** क्षेत्रांशी संबंधित राज्यस्तरीय धोरणांची आखणी करण्यासाठी विभागास आवश्यक ती सहाय्यता प्रदान करणे तसेच त्या धोरणांची क्षेत्रीय स्तरावर प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करणे.
- सर्व शासकीय व निमशासकीय विभाग तसेच उपविभागांमध्ये आवश्यक समन्वय साधणे व तंत्रज्ञान क्षेत्रासंदर्भात मार्गदर्शन करणे.

**४.२ ई-प्रशासन:**

- राज्यात सर्व शासकीय सेवांचे डिजिटायझेशन व एकत्रीकरण करणे.
- राज्यात नागरिक-केंद्रित ऑनलाइन सेवा विकसित करणे.
- राज्यातील नागरिकांना विविध लाभ थेट पोहोचविण्यासाठी DBT (Direct Benefit Transfer) योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तांत्रिक सहाय्य करणे.
- राज्यात “One State- One Portal” ही संकल्पना कार्यान्वित करणे.

**४.३ कृत्रिम बुद्धिमत्ता व उदयोन्मुख तंत्रज्ञान विकास:**

- सर्व क्षेत्रात AI आधारित प्रकल्प राबविण्यास तांत्रिक सहाय्य करणे (उदा. आरोग्य, शेती, शिक्षण इत्यादी..)
- AI व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधन, विकास व नवोपक्रम यांना प्रोत्साहन देणे.

**४.४ उद्योग प्रोत्साहन:**

- IT&ITES, इलेक्ट्रॉनिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता **व उदयोन्मुख तंत्रज्ञान क्षेत्रात** उद्योगांना प्रचलित शासन धोरणाप्रमाणे सवलती व प्रोत्साहन देणे,
- विभागांतर्गत विविध तांत्रिक क्षेत्रात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी उपक्रम राबविणे.

**४.५ स्टार्टअप व नवोन्मेष:**

- विभागांतर्गत विविध तांत्रिक क्षेत्रात स्टार्टअप्ससाठी विविध सहाय्य योजना राबवणे.
- विभागांतर्गत विविध तांत्रिक क्षेत्रात इनक्युबेशन सेंटर्स व इनोव्हेशन हब्स विकसित करण्यासाठी विविध उपक्रम राबवणे.

**४.६ कौशल्य विकास:**

- डिजिटल कौशल्य व कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
- कौशल्य विकासासाठी विविध विभाग तसेच यंत्रणा यांच्यात समन्वय साधणे.

**४.७ सायबर सुरक्षा व महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा:**

- राज्यातील सायबर सुरक्षा मजबूत करणे.
- **राज्यात महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा जसे राज्य डेटा सेंटर, नेटवर्क इत्यादी..** (Critical Infrastructure like State Data Centre, Network etc) **यांचा विकास व देखभाल करणे.**
- **सर्व विभागांना आयटी सुविधा व्यवस्थापन सेवा** (IT-FMS Services) **प्रदान करणे/ सहाय्य करणे.**
- डेटा संरक्षण व गोपनीयतेसंबंधी उपाययोजना राबविणे.

४.८ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत सहकार्य (Collaborate) करणे, तसेच विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व Technology Exposure Visits आयोजित करणे.

४.९ केंद्र शासनाच्या विविध योजना तसेच कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करणे व केंद्रीय संस्था सोबत आवश्यक समन्वय साधणे.

४.१० UIDAI सोबत समन्वय साधून आधार अधिनियम व नियमांतर्गत सर्व संबंधीत बाबींवर कार्यवाही करणे.

४.११ आयुक्तालयातंर्गत सर्व प्रशासकीय व वित्तीय बाबी पार पाडणे.

४.१२ राज्य शासनाकडून वेळोवेळी दिलेल्या आदेशांचे पालन करणे व त्यानुषंगाने जबाबदाऱ्या पार पाडणे.

**५. प्रशासकीय रचना:**

- आयुक्तालयाच्या प्रमुख पदावर भारतीय प्रशासनिक सेवेमधील आयुक्त स्तराचा अधिकारी यांची "आयुक्त (Commissioner)" म्हणून नियुक्ती करण्यात येईल.
- आयुक्तालयासाठी आवश्यक पदसंख्या व त्यांची वेतनश्रेणी शासनाकडून स्वतंत्र आदेशाद्वारे निश्चित करण्यात येईल.

**६. आर्थिक तरतूद:**

आयुक्तालयासाठी आवश्यक निधी इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या मंजूर अर्थसंकल्पातून उपलब्ध करून देण्यात येईल.

७. सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाने दिनांक ०७/०४/२०२६ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमीत करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२४१२५००६५९११ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VIRENDRA SINGH

Digitally signed by VIRENDRA SINGH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=B4F256882EF5E2E3E30EC0593882F0A1D4BBA7838441BDF1BAAFD6DB2B2587FE, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AA1AC1281E05D326F11ABC792C248AC1D6B09689A522356C444CA965C22B87D2, cn=VIRENDRA SINGH
Date: 2026.04.24 12:54:08 +05'30'

**( विरेंद्र सिंह )**
**सचिव, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व**
**कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. उप मुख्यमंत्री (न.वि., गृ.नि., सा.बां. (सा.ऊ.), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.उप मुख्यमंत्री (राऊशु, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक व औकाफ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
६. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई,

७. मा. मंत्री (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव (सेवा), सा.प्र.वि., मंत्रालय, मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. महालेखापाल-१, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
१२. महालेखापाल-१, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
१३. महालेखापाल-२, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१४. महालेखापाल-२, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
१५. सर्व विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालये,
१६. प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८. आयुक्त, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता आयुक्तालय, मुंबई,
१९. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादीत, मुंबई,
२०. सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
२१. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२२. सदस्य सचिव, राजीव गांधी विज्ञान तंत्रज्ञान आयोग, मुंबई,
२३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२४. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
२५. जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालये (सर्व),
२६. सर्व मंत्रालयीन विभाग,
२७. निवडनस्ती.